लोकमत HELLO
नागपूर, शनिवार ७ फेब्रुवारी २००९



# प्रत्येक गर्भवतीने निर्धार केला तर स्त्री भ्रूणहत्या रोखणे शक्य -स्मृती इराणी

नागपूर, दि. ६ (प्रतिनिधी)- गर्भवती असलेल्या प्रत्येक आईने स्त्रीभ्रूणहत्या होऊ न देण्याचा ठाम निर्धार केला तर या देशातील स्त्री भ्रूणहत्येच्या प्रकाराला आळा बसेल, असे प्रतिपादन करताना, आपली आई याचे उदाहरण असल्याचे सांगून प्रख्यात कलावंत स्मृती

**□ तुलसीची रंगली दिलखुलास मुलाखत**

**□ ज्येष्ठ स्त्रीरोगतज्ज्ञांचा हृद्य सत्कार**

इराणी यांनी सर्वांना अंतर्मुख केले. नागपूर ऑबस्टॅटिक अॅन्ड गायनॉकॉलॉजिकल सोसायटीच्या वतीने आयोजित एका कार्यक्रमात त्या मुलाखतीदरम्यान बोलत होत्या. याप्रसंगी व्यासपीठावर डॉ. सुब्रजीत दासगुप्ता, डॉ. सुनिता घिके व डॉ. चैतन्य शेंबेकर उपस्थित होते.

कार्यक्रमाचा आरंभ दीप प्रज्वलनाने करण्यात आला. याप्रसंगी वैद्यकीय व शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावलेल्या मान्यवरांना शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह प्रदान करून सन्मानित करण्यात आले. यात डॉ. बी.एस.चौबे, डॉ. अशोक गुप्ता, डॉ. अशोक अढाऊ, डॉ. शाम बाभूळकर, डॉ. किशोर टावरी, डॉ. लीला अनागोंदीकर, डॉ. प्रमिल असोलकर, डॉ. प्रभा भट्टाचार्य, डॉ. आशा देशपांडे, डॉ. कमल देशमुख, डॉ. मीना देशमुख, डॉ. शकिला खान, डॉ. निर्मला मोकादम, डॉ. मंगला मुळे, डॉ. सुमती रिधोरकर, डॉ. फिरोजा सामद, डॉ. सुमन सुभेदार, डॉ. मंजुळा रोहतगी, डॉ. नलिनी तोरणे, डॉ. कुसुमताई वांकर व डॉ. कमल शस्त्रगार यांचा समावेश होता.



कार्यक्रमाचे दीप प्रज्वल करून उद्घाटन करताना स्मृती इराणी. सोबत डॉ. सुब्रजीत दासगुप्ता, डॉ. सुनिता घिके.

३३ टक्के आरक्षणाबाबत मत व्यक्त करताना डॉ. दासगुप्ता यांनी प्रथम मानसिकता बदलण्याची गरज व्यक्त केली. आरक्षण हे केवळ जागांपुरते मर्यादित नसून, त्याचा व्यापक अर्थ समजण्याची गरज असल्याचे प्रतिपादन केले. सध्याच्या झपाट्याने घसरत्या शैक्षणिक दर्जाबद्दल चिंता व्यक्त करून त्यांनी, भावी पिढीला आपण काय देणार आहोत, असा प्रश्न केला.

डॉ. अनुराधा रिधोरकर यांनी स्मृती इराणी यांची रंगतदार मुलाखत घेतली. या मुलाखतीला उत्तरे देताना स्मृती इराणी यांनी सांगितलेल्या कथनाचा सारांश असा-

शाळकरी वयात मी बरीच अबोल होते. पुस्तके आणि मी व शाळा एवढेच मर्यादित जग होते. माझ्या एका भावाने मला त्यातून बाहेर पडण्यास सुचवले. त्यानंतर जेव्हा मी मिस इंडिया या स्पर्धेसाठी मुंबईला जाण्याचे ठरवले तेव्हा घरच्यांनी विरोध केला. मात्र मी ठाम निर्धार केला असल्याने मी मुंबईची वाट धरली. मुंबईत आल्यावर मिस इंडिया स्पर्धेसाठी पैशाची गरज लक्षात आली. वडिलांना पैसे मागितल्यावर त्यांनी, तुला शिक्षणासाठी पैसे फुकट देईन पण स्पर्धेत भाग घ्यायचा असेल तर कर्जाऊ देईन, असे सांगितले. वडिलांकडून कर्जाऊ पैसे घेऊन मी त्या स्पर्धेत उतरले. अंतिम फेरीपर्यंत गेले पण विजेती ठरले नाही. माझ्यासोबतच्या मुली रडत होत्या आणि मी वडिलांकडून घेतलेल्या कर्जाच्या पैशाच्या परतफेडीचा विचार करीत होते. या स्पर्धेत मिळालेली बक्षिसे मी वडिलांना देऊन टाकली व उरलेल्या पैशासाठी नोकरी सुरू केली. नोकरीसाठी केलेल्या संघर्षाचाही त्यांनी यावेळी उल्लेख केला. बालाजी फिल्मसमध्ये प्रवेश हा योगायोगाने झाल्याचे सांगून त्यांनी या मालिकेने त्यांना दिलेल्या यशाचा व सन्मानाचा उल्लेख केला. मालिकांमधून भारतीय संस्कृती जपली जावी इतकी आपली संस्कृती कमकुवत नसल्याचे मत व्यक्त करून स्मृती इराणी यांनी, राजकारणात आपण स्वेच्छेने आल्याचे सांगितले. या सर्व प्रवासात आपले पती झुबेर इराणी यांची मोलाची साथ असल्याचे कृतज्ञपणे नमूद करून, ते जर माझ्या पाठिशी नसते, तर मी आज इथे नसते असे सांगितले. याप्रसंगी त्यांनी बऱ्याच प्रश्नांची खिलाडूपणे उत्तरे दिली.